**ठळक बातम्या**

- भूतान आणि भारतादरम्यान स्वच्छ ऊर्जा भागीदारी वाढवण्याचा प्रधानमंत्र्यांच्या भूतान दौऱ्यात संकल्प

- शांततापूर्ण आणि निर्भय निवडणुकांसाठी यंत्रणांनी दक्ष राहण्याची राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांची सूचना

- मद्या उत्पादन शुल्क धोरण घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना २८ मार्चपर्यंत सक्तवसुली संचालनालयाची कोठडी

- रशियाची राजधानी मॉस्को इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यात आत्तापर्यंत ६० जणांचा मृत्यू, भारतासह, संयुक्त राष्ट्रसंघ आणि इतर देशांनीही केला हल्ल्याचा निषेध

**आणि**

- आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज विरुद्ध दिल्ली कॅपीटल तसंच कोलकत्ता क्नाईट रायडर्स विरुद्ध सनरायझर्स हैद्राबाद असे दोन सामने

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या २ दिवसीय भूतान दौऱ्यादरम्यान उभय देशांतर्फे एक संयुक्त निवेदन जारी करण्यात आलं. जलविद्युत, सौर आणि हरित हायड्रोजन या क्षेत्रांत उभय देश आपली स्वच्छ ऊर्जा भागीदारी वाढवून नवीन प्रकल्पाचा विकास या विषयी या निवेदनात उल्लेख केला आहे. दोन्ही देशांमध्ये असलेले सांस्कृतिक आणि आध्यात्मिक बंध यामुळेच भारत आणि भूतानची मैत्री टिकून

असल्याचं या संयुक्त निवेदनात म्हंटल आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांच्या हस्ते थिंपु इथं भारताच्या सहाय्यानं बनवल्या गेलेल्या ग्यालत्सुएन जेटसन पेमा मातृ तसंच बाल रुग्णालायचं उद्घाटन झालं.

<><><><><><>

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्लीतील विशेष न्यायालयानं काल 'मद्यावरील उत्पादन शुल्क कर धोरण' घोटाळा प्रकरणी २८ मार्चपर्यंत ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाच्या कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. केजरीवाल यांना गुरुवारी रात्री अटक केल्यानंतर काल विशेष सीबीआय न्यायालयात हजर करण्यात आलं. विशेष सीबीआय न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी त्यांना कोठडी बजावली आहे. दरम्यान, अटकेनंतरही केजरीवालच दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून कायम राहतील, असं आम आदमी पक्षानं सांगितलं आहे.

<><><><><><>

संसदेत प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतल्याच्या आरोपावरून सी बी आय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेनं तृणमूल काँग्रेसचे नेते महुवा मोईत्रा यांच्या कोलकात्यासह इतर काही ठिकाणांवर आज छापे मारले. सी बी आय नं लोकपालांच्या निर्देशानुसार मोईत्रा यांच्याविरोधात प्रथम माहिती अहवाल दाखल केला आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल सहा महिन्यांत सादर करण्याचे निर्देश सी बी आय ला दिले आहेत. संसदेत प्रश्न विचारण्यासाठी एका व्यापाऱ्याकडून लाच घेतल्याचा आरोप असलेल्या मोईत्रा यांना संसदेच्या नितीशास्त्र समितीच्या शिफारशीवरून डिसेंबर महिन्यात लोकसभेतून बडतर्फ करण्यात आलं होतं.

<><><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध राज्यातल्या निवडणूक प्रक्रियांना वेग आला आहे. मध्यप्रदेशात पोलिस आणि अंमलबजावणी यंत्रणांनी आतापर्यंत १४ कोटी २२ लाख रुपायांहून अधिक किमतीचं विविध साहित्य जप्त केलं. त्रिपुरामध्ये १९ आणि २६ एप्रिल रोजी २ टप्प्यात होणाऱ्या मतदानासाठी निवडणूक प्रचाराला वेग आला आहे. बांदिपोरा आणि काश्मीरमध्ये कुपवडा जिल्ह्यातल्या ६ जागांसाठी पारदर्शी आणि नि:पक्ष निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यात पूर्वनिश्चित नसलेल्या स्वरूपात बॅलेट यूनिट, कंट्रोल यूनिट, इ व्ही एम आणि व्ही व्ही पॅट चं वितरण करण्यात आलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावं निश्चित करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची आज नवी दिल्ली इथं पक्षाच्या मुख्यालयात बैठक होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह समितीचे सदस्य आणि राज्यांतील पदाधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी काल भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघ तसंच नागपूर आणि रामटेक लोकसभा मतदारसंघाच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला. लोकसभा निवडणूकीसाठी इथे पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला मतदान होणार आहे. भंडारा- गोंदिया लोकसभा मतदारसंघात त्यांनी गोपेवाडा आणि पलाडी इथल्या प्रस्तावित मतमोजणी केंद्रांना भेट देऊन पाहणी केली. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातल्या विविध नियंत्रण कक्षांनाही भेट दिली. शांततापूर्ण आणि निर्भय निवडणुकांसाठी यंत्रणांनी दक्ष

राहण्याची सूचना त्यांनी केली. मतदारांनी राष्ट्रीय कर्तव्याच्या भावनेतून मतदान करून मतदानाचं प्रमाण वाढवण्यात सहभाग द्यावा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

<><><><><><>

महाराष्ट्र सरकारनं काल इक्बाल सिंग चहल यांची मुख्यमंत्र्यांच्या सचिवालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून नियुक्ती केली आहे. भारतीय निवडणूक आयोगानं राज्य सरकारला भूषण गगराणी यांची मुंबई महानगरपालिकेचे नवीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्याचे निर्देश दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. लोकसभा निवडणुकीच्या वेळापत्रकाच्या घोषणेनंतर भारतीय निवडणूक आयोगानं ३ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवा करणाऱ्या नागरी आयुक्त आणि अतिरिक्त किंवा महापालिका आयुक्तांची बदली करण्याचे आदेश दिले होते.

<><><><><><>

रशियाची राजधानी मॉस्को इथल्या क्रॉकस सिटी हॉलमध्ये शिरून तीन सशस्त्र हल्लेखोरांनी अंदाधुंद गोळीबार केला. बंदूकधाऱ्यानी केलेल्या गोळीबारात ६० पेक्षा अधिक जण ठार झाले, तर शंभराहून अधिक जण जखमी झाले आहेत. या दहशदवादी हल्ल्याचा संयुक्त राष्ट्र प्रमुख आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने निषेध केला आहे. या हल्ल्याची जबाबदारी द इस्लामिक स्टेट खोरासान या गटाने स्वीकारली आहे. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरस यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहे. आपल्या संवेदना पीडीतांच्या कुटुंबियांसोबत असून, रशियन फेडरेशनसोबत एकजुटीने उभे असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

अमेरिका, युरोपियन महासंघ, ब्रिटन, फ्रान्स, स्पेन, संयुक्त अरब अमिराती यांच्यासह अनेक देशांनीही या हल्ल्याचा निषेध केला आहे. या हल्ल्यात बळी पडलेल्यांबद्दल शोक आणि निषेध व्यक्त करण्यासाठी, नवी दिल्लीतल्या रशियन दूतावासात रशियाचा राष्ट्रध्वज अर्ध्यावर आणला आहे.

<><><><><>

भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या तीन स्वातंत्र्यसेनानींना आजच्या दिवशी १९३१ साली फाशी देण्यात आली. हा दिवस शहीद दिवस म्हणून पाळला जातो. यानिमित्ताने पंजाबसह देशभरात हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

<><><><><>

सी बी एस ई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं गैरप्रकार आढळून आल्यानं २० शाळांची संलग्नता काढून घेतली आहे. यात केवळ दिल्लीतल्या पाच शाळांचा समावेश आहे. सी बी एस ई नं जारी केलेल्या निवेदनात ही माहिती दिली आहे. मंडळानं अचानक केलेल्या तपासणीत संलग्नता तसंच परीक्षा घेण्याबाबत आखून दिलेल्या नियमांच्या पालनात विसंगती आढळून आल्यानं ही कठोर कारवाई केल्याचं निवेदनात म्हटलं आहे. पटावर खोटी विद्यार्थी संख्या दाखवणे, अपात्र विदयार्थ्यांना प्रवेश देणे, व्यवस्थित नोंदी न ठेवणे यासारखे अनेक गैरप्रकार या शाळांमध्ये आढळून आल्याचं सी बी एस ई नं म्हटलं आहे. याबाबत सखोल चौकशी करून शाळांची सी बी एस ई मंडळाशी असलेली संलग्नता काढून घेतली आहे.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी साडेतीन वाजता, पंजाब किंग्ज विरुद्ध दिल्ली कॅपीटल, तर संध्याकाळी साडेसात वाजता कोलकत्ता क्नाईट रायडर्स विरुद्ध सनरायझर्स हैद्राबाद असे दोन सामने होणार आहेत.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी काल चेन्नई सुपर किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू यांच्यात झालेला सलामीचा सामना चेन्नईनं ६ गडी राखून जिंकला. बंगळुरुनं विजयासाठी दिलेलं १७४ धावांचं आव्हानं चेन्नईनं १८ षटकं आणि ४ चेंडूत केवळ ४ गड्यांच्या मोबदल्यात गाठलं.

<><><><><>

भारताचा बॅडमिंटनपटू किदम्बी श्रीकांत यानं स्विस खुल्या स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

स्वित्झर्लंडमधील बसेल इथं काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत त्यानं ली चिया हाओ याचा २१-१०, २१-१४, असा पराभव केला. उपांत्य फेरीत आज श्रीकांतचा सामना लिन चुन यी याच्यासोबत होणार आहे. उपांत्यपूर्व फेरीच्या इतर सामन्यांमध्ये भारताच्या प्रियांशू राजावत आणि किरण जॉर्ज यांना पराभव पत्करावा लागला.

<><><><><>

यूएस सिनेटने १.२ ट्रिलियन डॉलर्स इतका आकस्मिक निधीला काल मंजूरी दिली. यामुळे अमेरिकेची शासनव्यवस्था अंशिक स्वरुपात ठप्प होण्याची नामुष्की टळली आहे. खर्चासाठी निधीच्या मुंजुरीसाठी मांडण्यात आलेला प्रस्ताव ७४-२४ इतक्या फरकानं काल मंजूर करण्यात आला.

<><><><><>

समुद्रात होत असलेल्या चाचेगिरीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तैनात केलेल्या आय एन एस कोलकाता या युद्धनौकेचं आज ताब्यात घेतलेल्या ३५ सोमाली चाच्यांना घेऊन मुंबईत आगमन झालं. या चाच्यांना यल्लो गेट पोलिसांच्या हवाली करण्यात आलं आहे. एडनच्या आखातात ही युद्धनौका तैनात केली होती. नौकेवर

सागरी चाच्यांच्या संशयास्पद हालचाली ड्रोनच्या सहाय्यानं आढळून आल्यानं भारतीय नौदलानं आय एन एस कोलकाताच्या माध्यमातून या चाच्यांना ताब्यात घेतलं होतं.

**<><><><><><>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला १ हजार कोटी रुपयांचा निधी हस्तांतरीत केला. हा निधी प्रामुख्यानं मेट्रो रेल्वे मार्ग बांधण्यासाठी खर्च केला जाणार आहे. हा निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अपेक्षित असलेल्या ५ हजार कोटी रुपयांचा भाग असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**//<><><><><><>//**